International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 18 May-June 2024

# सत्यशोधक समाजसुधारक कै. आत्माराम मुकुंद महाजन

**प्रा. डॉ. आर. पी. किरमिरे**
इतिहास विभाग प्रमुख
श्री जी. सी. पाटील मुनघाटे कला, वाणिज्य व विज्ञान महावीध्यालय धानोरा
जिल्हा – गडचिरोली
**Email:** Kirmire_dha@rediffmail.com
**Corresponding Author - प्रा. डॉ. आर. पी. किरमिरे**
**DOI- 10.5281/zenodo.11655658**

**सारांश :-**

महाराष्ट्र संत, महात्मे आणि समजसुधारकांची भूमी आहे. प्रामुख्याने महात्मा ज्योतिराव फुले यांची प्रेरणा घेऊन, आधुनिक विचारांनी भारावलेल्या तरुणांनी ब्रिटिशांच्या अन्यायी राजवटी विरुद्ध, तसेच समाजातील अन्याय व अनिष्ठ चालीरीती विरुद्ध वाचा वाचा फोडण्यासाठी 20 व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच संघटना स्थापन करून सामाजिक समस्यांना वाचा फोडण्यास सुरुवात केली. या पासून महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हादेखील अलिप्त राहू शकला नाही. आत्माराम मुकुंद महाजन यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील परीसरात महात्मा ज्योतिराव फुले यांची प्रेरणा घेऊन समजसुधारणेचे महान कार्य केले आहे. त्यांच्या या कार्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात सामाजिक जागृती घडून येण्यास मदत झाली.

**सत्यशोधक कै. आत्माराम मुकुंद महाजन**

आत्मारामजी महाजन यांचा जन्म इ. स. 1880 मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील, ब्रम्हपुरी जवळील नवेगाव येथे शेतकरी कुटुंबात झाला होता.[i] त्यांचे प्राथमिक शिक्षण, ब्रम्हपुरी प्राथमिक शाळा क्र. 1 मध्ये झाले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी शेतकी शाळेत प्रवेश घेतला, परंतु ते शिक्षण अर्धवट सोडून इ. स. 1910 पासून त्यांनी समाजकार्याला वाहून घेतले.

त्यांच्यावर महात्मा ज्योतीराव फुले व सत्यशोधक समाजाचा प्रचंड प्रभाव होता. सुरुवातीच्या काळात त्यांनी जिल्ह्यात स्थापन झालेल्या चांदा जिल्हा संघामध्ये प्रचारकाचे कार्य केले. या काळात जिल्ह्यातील कॉंग्रेस कमेटी वकील गटाच्या ताब्यात होती. पहिल्या महायुद्ध काळात वार लोन देवू नये, सैन्यात भरती होवू नये, म्हणून जिल्ह्यात त्यांनी प्रचार केला. जिल्हा संघाचे प्रचारक म्हणून प्रचारक म्हणून कार्य करीत असतांना संघाच्या कार्यकर्त्यांना अटक झाली. त्यात महाजन यांना इ. स. 1918 ला 2 वर्ष 6 महीने तुरुंगवासाची शिक्षा झाली. त्या वेळी सोबतच्या लोकांना कॉंग्रेस कमेटीने ब्राह्मण व्यक्ति होत्या म्हणून अपील करून सोडविले परंतु बहुजन समाजातील महाजन यांना सोडविले नाही. याचाच निषेध म्हणून त्यांनी तुरुंगातून सुटका झाल्यावर इ. स. 1921 पासून सत्यशोधक समाजाच्या कार्याला वाहून घेतले. कुणबी जात सुधारणा, अस्पृश्यता निवारण, शिक्षण प्रसार असे अनेक कार्य त्यांनी ब्रम्हपुरी तालुक्यात केले.

ब्रम्हपुरी लोकल बोर्डाचे ते अध्यक्ष होते. तसेच सॅनीटेशन पंचायतीचेही अध्यक्ष होते. इ. स. 1932 च्या सुमारास त्यांनी ब्रम्हपुरी या ठिकाणी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. आत्मारामजी महाजन यांच्या प्रयत्नाने ब्रम्हपुरी येथील गौतम नगरातील दलित वस्तीत विहीर बांधकाम झाले.[ii]

**कुणबी जातसभा ब्रम्हपुरी तालुका 1921-22**

श्री आत्मारामजी मुकुंद महाजन यांच्या नेतृत्वाने चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी या ठिकाणी जाती सुधारणे बद्दलची पहिली सभा दिनांक 24 मार्च 1921 ला भरविण्यात आली होती.

तालुक्यातील मालडोंगरी या ठिकाणी कुणबी जात सभेचे दुसरे अधिवेशन 16 एप्रिल 1922 रोजी भरविण्यात आले होते. सर्व समाज

बांधवांनी एकत्र होऊन कार्य करण्याचे ठरवून त्यात खालील ठराव पारित करण्यात आले होते.

1. मुलाचे वय 20 व मुलीचे वय 11-12 वर्षाचे झाल्याशिवाय लग्न करू नये.
2. लग्नापूर्वी मुलीला लुगडे नेसण्यास हरकत नाही.
3. अधेरी व आजेबोंदरी (हुंडा व मानपान) ची बाब नष्ट करून, होम पेटवला जावा. मुलीच्या आई, बापांनी मन मानेल तेवढे पैसे व धान्य घेऊन आपल्या पोटच्या कन्येची गाई, म्हशीसारखी विक्री करू नये.
4. नवरा सोडलेल्या बायकोला किंवा बायको सोडलेल्या नवऱ्याला जातीने पंचायत करून परवानगी दिल्याशिवाय दूसरा पाट (दुसरी बायको ) किंवा विवाह करता येणार नाही. पाट करतांना मन मानेल तेवढा देज (हुंडा) घेऊ, देऊ नये.
5. अस्पृश्य माणूस किंवा कुणीही व्यक्तीने कुणब्याला जोड्याने मारल्यास विटाळ मानू नये किंवा जातीदंड घेऊ नये.
6. ज्या बायांनी पहरावात बदल करून सुधारीत पेहराव केल्यास त्यास हरकत घेऊ नये.
7. कोणतीही पूजा अर्चा, धार्मिक कार्य, विवाह, सत्यनारायण कथा आपल्या हाताने जातीतच करून घ्यावा. जोतिषीला बोलावून त्याचेकडून कोणताच विधी करू नये. तसेच त्याला दान धर्म देऊ नये.
8. प्रत्येकाने आपल्या मूला, मुलीस शिकवून ज्ञानवाण करावे.
9. दोषी माणसावर नगदी दंड केल्यास तो शिक्षण फंडात जमा करावा.
10. वरील ठरावाप्रमाणे सर्वांनी वागावे तसे न वागल्यास समग्र जातीने त्यास दोषी समजून बहिष्कार टाकावा.[iii]

**सत्यशोधक समाज**

मराठेशाहीच्या अस्तानांतर स्थापन झालेल्या ब्रिटिश सत्तेच्या काळात घडून आलेल्या शिक्षणाच्या प्रसारामुळे, आधुनिक युगाकडे वाटचाल सुरू झाली. समजजीवणात बरेच स्थित्यंतर व जागृती घडून, सरंजामी शोषण, जातीप्रथेवर आधारलेली सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्था त्यामुळे प्रभावित होवू लागली होती. महात्मा फुले, या सामाजिक चळवळीचे महाराष्ट्रातील प्रणेते होते.[iv] चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरीचे आत्माराम मुकुंद महाजन यांच्यावर महात्मा ज्योतीराव फुले व त्यांच्या सत्यशोधक समाजाचा जबरदस्त प्रभाव होता. जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात असलेले ब्राह्मण- ब्राम्हणेतर भेदभाव, अस्पृश्यता, सामाजिक अंधश्रद्धा व चालीरीती विरुद्ध त्यांनी आवाज उठवून, जिल्ह्यात इ. स. 1932 च्या सुमारास सत्यशोधक समाजाची स्थापना केली. विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात – पांढरी सीताराम पाटील, अमरावतीत- काशीराम बापू देशमुख, वर्धा- जाधव, वामनराव चोरघडे हे ज्या वेळी कार्य करीत होते, त्याच वेळी चंद्रपूर जिल्ह्यात आत्मारामजी महाजन सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होते.[v]

या समाजाच्या माध्यमातून त्यांनी लग्न, विवाहातील टाकावू चालीरीती, बुवाबाजी, नवस, अंगात येणे, विटाळ, पेहराव या विषयी जागृती घडवून सामाजिक विषमतेविरुद्ध आवाज उठवला. मध्यप्रांतातील मराठी भाषिक विभागात समावेश असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात सत्यशोधक समाजाचा प्रभाव 20 व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच झाला होता. सत्यशोधक समाजाच्या रूपाने वैदीक कर्मकांडाचा विरोध करणाऱ्या या समाजाचा प्रसार कुणबी, तेली, माळी या जातींमध्ये झाला होता.[vi] या समाजाचे सभासद होतांना प्रत्तेकाला प्रतिज्ञा करावी लागत होती. यात,

"सर्व मनुष्य एकाच ईश्वराची लेकरे आहेत. त्यांचे व माझे बंधुत्वाचे नाते आहे. हे जाणून वागण्याचा मी प्रयत्न करीन; देवाची भक्ति, पूजा उपासना वैगेरे करतांना तसेच धर्मविधी करतांना मी कोणाही मध्यस्ताची जरूरी ठेवणार नाही व असे वागण्याविषयी इतरांचे मन वळविण्यास झटेन, माझ्या मूला, मुलीस विध्या शिकविल्याशीवाय मी राहू शकणार नाही. राज्यकर्त्यांशी राजनिष्ठेने वागेन अशी सर्वसाक्षी सत्यस्वरूप परमात्म्याला स्मरून मी प्रतिज्ञा करितो, हा माझा पवित्र उद्देश सिद्धीस नेऊन जन्माचे सार्थक करण्यास परमात्मा मला सामर्थ्य देवो."

आत्मारामजी महाजन यांनी आपल्या साहित्यातून तत्कालीन स्थितीवर ताशेरे ओढुन सामाजिक संत व सत्य धर्माच्या प्रसाराचे कार्य केले, त्यांनी 'आमचा देवधर्म' या दुसऱ्या व्याखानातील 'मोलाचा संदेश' या सदरात लिहिले,

देवाच्या दृष्टीने सर्व मनुष्य सारखेच. तेथे वरिष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच, कला-गोरा, असला पक्षपात मुळीच नाही. कित्येक महात्मे शुद्रात्मे तर असा मनुष्या-मनुष्यात फरक ठेवून देव मनुष्याची उत्पत्ति करीत नाही. उत्पन्न करते वेळी तो सगळयांना एकसारखेच उत्पन्न करतो. अमुक एक जात देवाची लाडकी व दुसऱ्या जाती नावडत्या असे मुळीच नाही. देव हा कोणत्याही मानुष्याचा उत्कर्षाकरिता नाही. तसाच तो कोणाचा अपकर्षही करीत नाही. गीता वचनाप्रमाणे प्रत्तेक मनुष्य स्वत:च आपला उत्कर्ष किंवा अपकर्ष करणारा असतो.

ब्रम्हपुरि परिसरात त्या काळात ब्राह्मण-ब्राह्मनेतर वाद मोठ्या प्रमाणात होता. ब्राह्मण समाजाकडून बाराभाई गणपतीची स्थापना करण्यात येत होती. म्हणून ब्राह्मनेतर समाजाच्या लोकांनी तेराभाई गणपतीची स्थापना करण्यास सुरुवात करण्यात आली. आत्माराम महाजन यांनी स्वत: सत्यशोधक समाजाच्या तत्वांची अंमलबजावणी करून, सत्यनारायनची पूजा ब्राम्हणाकडून न करता ते स्वत: करू लागले. बहुजन समाजाच्या जागृतीसाठी सत्यशोधक समाजाला त्यांनी वाहून घेतले होते. ते या चळवळीचे जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते होते. या व्यतिरिक्त जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीत विदर्भातील जलसा कलावंत म्हणून मांगलीचे निलकंठराव देवतळे सत्यशोधक चळवळीत सक्रिय कार्यकर्ते होते.[vii]

**समाज सुधारक संघ ब्राम्हपुरी**

16 जून 1934 रोजी श्री आत्माराम महाजन यांनी ब्रम्हपूरी येथे समाज सुधारक संघ स्थापन केला. या समाजाचे सभासद होत असतांना खालील प्रमाणे प्रतिज्ञा करावी लागत होती.

“मी ------------------------ प्रतिज्ञा करतो की, ब्रम्हपुरी येथे समाज सुधारक संघाचे सर्व नियम मला मान्य असून मी त्या संघाचा आज तारखेपासून मेंबर झालो आहे. मी स्वत; समाजाच्या नियमाप्रमाणे वागेन आणि इतर जनांतही त्याचा प्रचार करीन. करीत प्रतिज्ञा पत्रावर स्वखुशीने आज रोजी मी सही केली आहे.”

अशा प्रकारची माहिती असलेले प्रतिज्ञा पत्र भरून ध्यावे लागत होते. तत्कालीन समाजात अनेक दोष निर्माण झाले होते अस्पृष्यता व बहुजन समाजातील घातक अंधश्रद्धा, टाकावू चालीरीती, बुवाबाजी, विटाळ या विरुद्ध समाज जागृतीचे कार्य या संघामार्फत चालत होते. श्री आत्माराम महाजन यांनी ‘शेतकऱ्यांची निकृष्ठावस्था व तीचे निर्मूलन’ या शीर्षकाखाली लिहिलेल्या लेखातील उतारा खालील प्रमाणे होता.

“ज्याने आपणाला व आपल्याला आवशक असणाऱ्या वस्तु परिपूर्ण अशा जगाला निर्माण करणाऱ्या सर्व शक्तिमान परमेश्वराची ओळख नाही. .... .. .. खंडोबा, म्हसोबा, बोकापुरी, मेसकाई, भवानी हेच त्यांचे हितकर्ते, दुख:हर्ते देव बनले आणि हे देव गोंड, गोवारी, ढीवर, महार लोकांच्या घरी ठाण्यात राहून, त्यांच्या अंगात शिरून त्यांच्याशी संभाषण करून त्यांचे दुख: हरू लागलेत .... .. .. .. .. त्यांना अधिक प्रसन्न करण्यासाठी लोक कोंबडे, बकरे बळी देऊन हजारो जीवांची हत्या करून ईश्वराचा रोष ओढऊन घेत आहेत. .. .. .. अंगात देव आननाऱ्या ढोंगी, दांभिक व फसवेगीरी लोकांनी त्यांचा अज्ञानाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांना भाळून टाकले.[viii]

प्रामुख्याने विवाह पद्धतीमध्ये सुधारणा व्हावी, म्हणून या संघाने कार्य केले. स्वत: आत्मारामजी महाजन यांनी आपल्या मुलीचा विवाह नोंदणी पद्धतीने करून समाजात आदर्श निर्माण केला. एकंदरीत ब्रम्हपुरी परिसरात समजसुधारणेचे कार्य या संघाद्वारे केले गेले.[ix]

त्यांनी स्वत:च्या मुलीचा विवाह नोंदणी पद्धतीने लावून आदर्श निर्माण केला. अस्पृष्यतेच्या त्या काळात महार, मांग, चांभार यांच्या घरी जाऊन त्यांना शिक्षणास प्रवृत्त केले. त्यांनी चालविलेल्या ब्रम्हनेतर चळवळीमुळे त्यांना सामाजिक बहिष्कारला तोंड ध्यावे लागले. एवढेच न्हवे तर. समाजकंटकांनी त्यांना मारहाण करून त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. एखाद्या जातीचे वर्चस्व जनसामान्यावर राहावे हे त्यांना मान्य न्हवते. ग्रामपंचायत निवडणुकीत एका खुर्चीवर शाळेच्या गेटसमोर बसून ‘मालगुजार, श्रीमंतांना मत देऊ नाक. गरीब उमेदवारांना मत द्या, त्यांना निवडून आणा.’ असे मोठ्या आवाजात हातवारे करून सांगत असत.[x] कर्ज काढून सणवार साजरे करू नका, नवस फेडू नका, असा गावोगावी फिरून प्रचार केला.

इ. स. 1936-37 मध्ये आत्मारामजींनी श्री मोतिरामजी लांजेवार यांना ‘ब्रम्हपुरी हितकरिणी शिक्षण संस्था’ स्थापनेसाठी मोलाची मदत केली. महाजन यांच्या प्रयत्नाने इ. स. 1939 ला पहिल्या

वर्षी 250 विध्यार्थी संस्थेला मिळाले. या संस्थेत मुख्याध्यापक म्हणून ब्राह्मण व्यक्तीची नेमणूक केली तेव्हा त्यास विरोध केल्यामुळे त्यांच्या सल्ल्याने श्री महादेवराव बनपूरकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी स्वत:च्या कृतीने तसेच साहित्यलेखन करून समाज जागृतीचे कार्य हिरीरीने केले. त्यांचे बेरेच समजप्रबोधनपर साहित्य प्रकाशित व अप्रकाशित आहेत. यात

1. जातीतील चालीरीती, रूढी व सुधारणा
2. शेतकऱ्यांची निकृष्ठ अवस्था व त्याचे निर्मूलन
3. शेतीचा व्यवहार आणि फसगत लेखांक-2
4. कुणब्यांना दोन शब्द, प्रकाशित 1926
5. कुणबी पोटजातीतील सुधारणा, प्रकाशित 1922
6. अभंगवाणी 1919 (जेल मध्ये लिहिलेली )

इत्यादी महत्वपूर्ण लिखाण त्यांनी केले आहे. एकंदरीत अनेक जाती, धर्म असलेल्या या जिल्ह्यातील सामाजिक जीवन वैशीष्ठयपूर्ण असे होते. ब्रिटिश काळात यातहिल समाज अनेक प्रथा, परंपरा व अंधश्रद्धा यांनी भरलेला असून, शिक्षणाची स्थिती सोचनिय असीच होती. ब्रिटिश काळात जिल्ह्यात शिक्षणाचा प्रसार घडून आल्यामुळे या कालखंडात सुशिक्षित वर्गाने समाजाचे सामाजिक नेतृत्व करून अनेक सभा, संघटना व संस्थेच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य केले. आत्माराम मुकुंद महाजन यांच्या कार्यामुळे या परिसरातील अज्ञानी लोकांना जागृत करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले

---

[i] म. सी. जांभूळे, लेख, 'एक झुंजार नेतृत्व कृतिशील सुधारक', थोर समाज सुधारक, स्वा. सेनानी कै. आत्मारामजी महाजन सुवर्ण महोत्सव स्मरणिका 1992 पृ. 8

[ii] कित्ता

[iii] भेंडारकर, ॲड. गोविंद संपा., आ. मू. महाजन, 'आक्रोश', पृ. 101, 103

[iv] डॉ. संभाजी खराट, 'सत्यशोधक चळवळ :वाटचाल आणि मामांसा', प्रतिमा प्रकाशन, पुणे 2005 पृ. 17,18

[v] भेंडारकर, ॲड. गोविंद संपा., आ. मू. महाजन, 'आक्रोश', प्रस्तावणा पद्मश्री डॉ. भाऊसाहेब कोलते. पृ. 9

[vi] Morten, J. T., Census of India 1911 Vol.- X. C.P.& Berar Report part I Printed at Calcutta 1912, page- 79

[vii] डॉ. संभाजी खराट, 'सत्यशोधक चळवळ :वाटचाल आणि मामांसा', प्रतिमा प्रकाशन, पुणे 2005 पृ. 17,18 पृ. 226

[viii] भेंडारकर, ॲड. गोविंद संपा., आ. मू. महाजन, 'आक्रोश', पृ. 12

[ix]कित्ता पृ. 12

यशोदाबाई कांबळे, लेख, 'एक झुंजार नेतृत्व कृतिशील सुधारक' स्मरणिका कै. आत्मारामजी महाजन पृ. 3

**Chief Editor**
**P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur(M.S), India

**Editorial & Advisory Board**

| | | |
|---|---|---|
| Dr. S. D. Shinde | Dr. M. B. Potdar | Dr. P. K. Pandey |
| Dr. L. R. Rathod | Mr. V. P. Dhulap | Dr. A. G. Koppad |
| Dr. S. B. Abhang | Dr. S. P. Mali | Dr. G. B. Kalyanshetti |
| Dr. M. H. Lohgaonkar | Dr. R. D. Bodare | Dr. D. T. Bornare |